नियमित दिवाणी दावा क्र.५३/२०१३
गोरख वि. सरकार

## निशाणी क्र.१६७ वरील आदेश

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज कैफीयतीमध्ये दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने सदरचा दावा जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यांनी दिलेल्या कैफीयतीमध्ये वादी, प्रतिवादीचे पूर्वाधिकारी यांचेदरम्यान फेरफार नं.१४०३ ने वाटप झाल्याचे नमूद केले आहे व मिळकतीमध्ये हक्क सांगितलेला आहे. तथापी, प्रतिवादी क्र.१३ यांनी निशाणी क्र.५५ कडे दिलेल्या कैफीयतीमधील परिच्छेद क्र.१२ मध्ये सन १९९० साली वाटप झाल्याचे नमूद केले आहे व त्याबाबत स्पष्ट कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१३ व प्रस्तुत प्रतिवादींचा मतलब एकच असल्याने प्रस्तुत प्रतिवादींनी वाटप झाले नसल्याचे नमूद केले आहे.

३. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१३ हे मिलापी झाल्याचे दिसून येत आहे. याकामी प्रतिवादी क्र.१३ यांनी पूर्वी तडजोड पुरसीस दिली होती ती न्यायालयाने फेटाळली आहे म्हणून पुराव्यादृष्टीने निशाणी क्र.४१ कडे दिलेल्या कैफीयतीमध्ये दुरुस्ती करणे भाग पडत आहे व त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. वादीने त्यांचे म्हणणे निशाणी क्र.१७० कडे दाखल केले व प्रतिवादीचा अर्ज खोटा असल्याचे कथन करुन तो अमान्य केला. सदरची दुरुस्ती मुदतीत नाही. वादीचा पुरावा संपलेला आहे. प्रतिवादीचा उलटतपास चालू आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीची कोणतीही तत्परता दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही. सदर दुरुस्तीमुळे कैफीयतीच्या मूळ स्वरुपात बदल होणार आहे व कैफीयत दुरुस्त केल्यास वादीचे नुकसान होणार आहे. प्रतिवादींनी अर्ज गैरहेतूने दिलेला आहे. दुरुस्तीमधील सर्व कागदपत्रे प्रतिवादीकडे होती. त्याची माहिती प्रतिवादींना होती परंतू त्यांनी त्याबाबत कैफीयतीमध्ये नमूद केलेले नाही. उलटतपासामध्ये त्यास काही गोष्टींबाबत विचारणा केल्यावर प्रतिवादीने सदरची दुरुस्ती मागितली आहे. ती दुरुस्ती कायदयाने देता येणार नाही व विलंबाने दुरुस्ती का मागितली याचे कारण देखील त्याने दिलेले नाही. या सर्व कारणांचा विचार होऊन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञ श्री.फडे यांनी युक्तीवाद केला की, सिलींग अधिकारी यांचा आदेश बंधनकारक नाही यासाठी वादीने दावा दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१३ याने वादीशी तडजोड केली आहे. तथापी, त्याची तडजोड न्यायालयाने अमान्य केली आहे. आता वादी व प्रतिवादी क्र.१३ यांचा मतलब सारखाच झाला आहे. त्या अनुषंगाने कैफीयतीमध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे नवीन कारण निर्माण होत नाही. तसेच ती मंजूर

केल्यास प्रतिवादींच्या बचावामध्ये देखील कोणताही बदल होती नाही व शेवटी त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. याउलट वादींचे विद्वान विधीज्ञ श्री.जी.पी.कदम यांनी युक्तीवाद केला की, दावा परिच्छेद क्र.३ मध्ये १३.०२.१९३९ चे वाटपाबाबत स्पष्टपणे नमूद केले आहे. फेरफार नं.१४०३ ने वाटप झाले नाही याबाबत प्रतिवादींनी नवा बचाव घेतलेला आहे. त्यांना मर्यादीत संधी आहे. कैफीयत दिली त्यावेळी जी परिस्थिती आहे ती तशीच आहे. प्रतिवादी हे तत्पर नाहीत. सदरची दुरुस्ती करुन प्रतिवादी हया त्यांच्या उणीवा भरुन काढू पहात आहेत व त्यासाठी सदरची दुरुस्ती मागितली आहे की जी मंजूर करता येणार नाही. उपरोक्त नमूद सर्व कायदेशीर बाबी विचारात घेता सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

७. अर्ज वाचला, अभिलेख पाहिला, प्रतिवादी क्र.१३ ने दाखल केलेली तडजोड न्यायालयाने अमान्य केलेली आहे. त्या अनुषंगाने दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटना सदर दुरुस्तीद्वारे प्रतिवादी कैफीयतीमध्ये नमूद करु इच्छीत आहेत. दुरुस्ती अर्जाचा विचार करतेवेळी न्यायालयाने लिबरल राहिले पाहिजे व कैफीयत दुरुस्तीचेवेळी आणखीनच लिबरल राहिले पाहिजे व तांत्रीक मुद्दयांवर दुरुस्तीचा अर्ज नामंजूर करु नये असे मा.उच्च न्यायालयाने विविध न्यायनिर्णयामध्ये नमूद केले आहे. हे मान्य आहे की, प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. सबब, त्यांना काही दंडात्मक शास्ती करुन दंडाची रक्कम वादीस देण्याचा आदेश करुन अर्ज

मंजूर केल्यास ते नैसर्गीक न्यायतत्वानुसार उचित ठरेल. तसेच वादीचा काही हक्कभंग होईल असे देखील काही दिसत नाही. त्या अनुषंगाने वादीस प्रतिवादींचा उलटतपास घेण्याची संधी उपलबध आहे. तसेच प्रकरणाचे स्वरुपामध्ये देखील कोणताही बदल होणार नाही. सबब, आदेश.

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.१६७ प्रतिवादीने वादींना रु.३०००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने सदरची दुरुस्ती प्रस्तुत आदेशाचे दिनांकापासून १४ दिवसाचे आत करावी.

माळशिरस
दिनांक–१९.१०.२०१९ दि.न्या.व.स्तर, माळशिरस

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : **S.S.Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Judgment signed by P.O. on : **19.10.2019.**

(d) Judgment uploaded on : **22.10.2019.**